**सं. फौ. अर्ज ३७/२०१५**

CNR – MHSN110002082015

## निशाणी क्र.३९ वरील आदेश

**१.** फिर्यादी पक्षाने सदरचा अर्ज हा आरोपींविरुध्द कलम ३१७ ऐवजी कलम ३१५ प्रमाणे दोषारोप निश्चित करण्याकरीता दाखल केलेला आहे. आरोपींवर भा.दं.वि. ३१७, १०९, ३४ प्रमाणे गुन्हा तोहमत आहे. नि. १६ खाली मे. कोर्ट यांनी दि. २९/०८/२०१५ रोजी यातील आरोपींवर दोषारोप नोंदवुन भा.दं.वि. ३१७, ३४ प्रमाणे दोषारोप ठेवला आहे.

**२.** दोन्ही आरोपींवर दोषारोप ठेवलेला गुन्हा गंभीर, दखलपात्र, अजामिनपात्र आहे. सदरकामी साक्षी जाबजबाबांचे काम चालु असुन सरकारपक्षातर्फे आत्तापर्यंत ७ साक्षीदार तपासण्यात आले आहेत. आरोपी नं. १ व २ यांनी त्यांचेत असलेल्या अनैतिक संबंधातुन पुरुष अर्भकास जन्म देऊन त्याचा त्याग करण्याच्या व जन्मजात पुरुष अर्भकाचे डी.एन.ए. याबाबत तपास झालेला असुन त्याबाबतचे दोन्ही रिपोर्टस् सरकार पक्षातर्फे नि. १५ च्या अर्जाने जा.क्र. १०२/२०१५ दि. ०७/०७/२०१५ आटपाडी पोलीस स्टेशन या जावक क्रमांकाने या मे. कोर्ट मजकुरी दाखल करण्यात आले आहे. सदरचे दोन्ही रिपोर्टस् हे पॉझिटीव्ह स्वरुपाचे असुन सरकारपक्षाच्या कथनाला सुसंगत, पुरक असे आहेत.

**३.** वरीलप्रमाणे सर्व वस्तुस्थिती असुन एकंदरीत फॅक्टस् व मे. कोर्ट यांचेसमोर आलेला पुरावा पाहता या केसमधील आरोपींवर ठेवण्योत आलेला चार्ज हा अल्टर होणे न्यायाचे व जरुरीचे आहे. भा.दं.वि. ३१५ प्रमाणे सदरील आरोपींवर गुन्हा तोहमत होणे

न्यायाचे आहे. सबब सरकारपक्षातर्फे विनंती की, गुन्ह्याचे गांभीर्य व एकुण समाजमनावर झालेला परिणाम पाहता सदरची केस मा. सत्र न्यायालय, सांगली यांचेकडे वर्ग होणेबाबत विनंती केली.

**४.** आरोपींनी सदर अर्जास आक्षेप घेऊन त्यांचे म्हणणे नि. ४० कडे दाखल केले. त्यांचे म्हणण्यानुसार फिर्यादीचा अर्ज व त्यातील संपुर्ण मजकुर धादांत खोटा, लबाडीचा व चुकीचा आहे. तो आरोपींना मान्य नाही कबुल नाही. फिर्यादीचे अर्जातील आरोपी नं. १ व २ यांनी त्यांचेतील असलेल्या अनैतिक संबंधातुन पुरुष अभर्सकास जन्म देऊन त्याचा त्याग करणेच्या उद्देशाने झुडुपात फेकुन दिलेची हकिगत असलेचा मजकुर खोटा व लबाडीचा आहे. तो आरोपींना मान्य नाही व कबुल नाही. त्याचप्रमाणे आरोपी व पुरुष अर्भकाचे डी.एन.ए. तपास झालेचे व ते रिपोर्ट पॉझीटीव्ह स्वरुपाचे असलेने त्याचा सरकारपक्षाच्या कथनाला सुसंगत व पुरक असलेचे कथन खरे नाही. तसेच वस्तुस्थिती फॅक्टस् व कोर्टासमोर आलेला पुरावा पाहता आरोपीवर भा.दं.वि. ३१५ प्रमाणे गुन्हा तोहमत होणे न्यायाचे असलेचे कथन खरे नाही.

**५.** फिर्यादी पक्षाचे कथनानुसार सदरकामी आरोपीवर भा.दं.वि. ३१७ व ३४ प्रमाणे चार्ज ठेवणेत आलेले आहेत. त्यामध्ये भा.दं.वि. कलम ३१५ प्रमाणे चार्ज ठेवणेजोगा कोणताही पुरावा याकामी आलेला नाही. त्याबाबत फिर्यादी पक्षाचे अर्जामध्ये कोणतेही स्पष्ट कथन अथवा खुलासा नाही. याही कारणास्तव अर्ज रद्द करणेत यावा. सदरकामी बहुतांश

साक्षीदारांचे जबाब याकामी नोंदविले गेलेले आहेत. त्यांचा पुरावा फिर्यादी पक्षाला पुरक नाही. त्यामुळे केवळ सदरचे प्रकरण प्रलंबित ठेवणेसाठी व आरोपींना नाहक त्रास देण्यासाठी फिर्यादी पक्षाने अशा प्रकारचा खोडसाळपणाचा अर्ज दिलेला दिसतो. सदरचा फिर्यादी पक्षाचा अर्ज मुळीच सदभावनेचा व प्रामाणिकपणाचा नाही. सबब तो फेटाळण्यात यावा. वरील सर्व वस्तुस्थितीत व परिस्थितीत फिर्यादीचा नि. ३९ कडील अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केली.

६. अभियोगपक्षाचा व आरोपींतर्फे आरोपींच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

७. अभिलेखाचे अवलोकन केले. माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी नि. १६ नुसार आरोपींविरुध्द भा.दं.वि. चे कलम ३१७ सहकलम ३४ अन्वये दोषारोप ठेवलेले आहे. अभियोगपक्षाच्या कथनानुसार सदर प्रकरणात डी.एन.ए. रिपोर्टस् दाखल करण्यात आले असुन ते पॉझीटीव्ह आलेले आहेत. अभियोगपक्षाने एकुण सात साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविलेले आहेत. अभिलेखावरील वर्दीजबाबाचे व जाबजबाबांचे अवलोकन केले असता सदर प्रकरणातील अर्भक हे त्याग करण्याच्या हेतुने फेकुन दिल्याचे कथन केलेले आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता अर्भक हे जन्मानंतर त्याचा मृत्यु घडवुन आणण्याच्या उद्देशाने काही कृती केली आहे याबाबतचा प्रथमदर्शनी पुरावा दिसुन येत नाही.

८. भा.दं.वि. चे कलम ३१५ नुसार दोषारोप निश्चित करण्याकरीता अभियोगपक्षाने हे सिध्द करणे आवश्यक आहे की, मुल जिवंत जन्माला येण्यास प्रतिबंध

करण्याचा किंवा जन्मानंतर त्याचा मृत्यु घडवुन आणण्याच्या उद्देशाने कृती केलेली आहे. परंतु अभिलेखाचे व पुराव्याचे अवलोकन केले असता याबाबतचा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. डी.एन.ए. रिपोर्टस् हे पॉझीटीव्ह आलेले आहेत म्हणुन मुल जन्माला आल्यानंतर त्याचा मृत्यु घडवुन आणण्याच्या उद्देशाने काही कृती केली आहे हे सिध्द होत नाही. त्यामुळे कलम ३१५ प्रमाणे दोषारोप ठेवण्याइतपत पुरावा अभिलेखावर आलेला दिसुन येत नाही. सबब अभियोगपक्षाचा सदरचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र ठरतो. सबब खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज नामंजूर करणेत येतो.

२. खर्चाबाबत काही आदेश नाहीत.

ANANT RADHAKISHAN TENGSE

Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2023.01.04 16:45:02 +0530

आटपाडी

दि. ०३/०१/२०२३

**(अनंत रा. टेंगसे )**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आटपाडी.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - A. A. Jamadar
Court - Jt. Civil Judge Jr.Dn. Atpadi.
Date - 03.01.2023
Order signed by the
Presiding Officer on - 03.01.2023
Order uploaded on - 03.01.2023